मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी संसदेत सरकारला धारेवर धरले!

## रेडझोन, बिबट प्रजनन नियंत्रण आदी प्रश्नांकडे वेधले लक्ष

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** 'राष्ट्र केवळ ना इमारतींनी, ना पूल बांधून किंवा इन्फ्रास्ट्रक्चर आणि बजेटच्या आकड्यांची बनत नाही, तर देशवासियांच्या हृदयातील उत्कट देशभक्तींमुळे राष्ट्र बनते' अशा शब्दात केंद्र सरकारची कानउघडणी करत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना सरकारला धारेवर धरले.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात झालेल्या राष्ट्रपतींच्या अभिभाषणात उल्लेख झालेल्या भयमुक्त वातावरणासंदर्भात बोलताना खासदार डॉ. कोल्हे यांनी शिरुर लोकसभा मतदारसंघातील ज्वलंत समस्या बनलेल्या बिबट्यांच्या उपद्रवाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. प्रत्येक देशबांधवाला भयमुक्त वातावरणात जीवन व्यतीत करण्याची इच्छा आहे. परंतु माझ्या शिरूर लोकसभा मतदारसंघात तशी परिस्थिती नाही. या ठिकाणी दिवसा थ्री फेज वीज पुरवठा होत नाही. त्यामुळे शेतीला पाणी देण्यासाठी रात्रीच्या अंधारात जावे लागते. अशा परिस्थितीत रोज कुठे ना कुठे नागरिकांवर बिबट्याचा हल्ला होत असतो. आजपर्यंत १८ हजार लोकांचं नुकसान झालं आहे, तर २२-२५



लोकांनी आपला जीव गमावला आहे, याकडे खासदार डॉ. कोल्हे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.ते पुढे म्हणाले की, नॅशनल वाईल्ड लाईफ सर्व्हेच्या अहवालाचा अभ्यास केला तर शिरुर लोकसभा मतदारसंघात बिबट्यांची संख्या जवळपास ४०० ते ५०० इतकी आहे. त्यामुळे जुन्नर वनविभागाने राज्य सरकारकडे बिबट प्रजनन नियंत्रणाचा प्रस्ताव पाठवला आहे. खरं तर हाच एकमेव पर्याय आहे असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने या संदर्भात अभ्यास करुन बिबट प्रजनन नियंत्रण धोरण लागू करावे अशी मागणी खासदार डॉ. कोल्हे यांनी केली. तसेच शिरुर लोकसभा मतदारसंघात शेतकऱ्यांना दिवसा थ्री फेज वीज पुरवठा करण्याचे निर्देश महाराष्ट्र सरकारला द्यावेत अशी मागणीही केली.

पिंपरी चिंचवड परिसरातील 'रेडझोन'च्या प्रश्नी संसदेत जोरदार आवाज उठवताना खासदार डॉ. कोल्हे यांनी केंद्र सरकारच्या धोरणातील विसंगतीवर बोट ठेवले. ते म्हणाले की, राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात गरीबांसाठी घरांचा उल्लेख केला तो निश्चितच स्तुत्य आहे. परंतु माझ्या शिरूर लोकसभा मतदारसंघात जवळपास दीड-दोन लाख नागरिक असे आहेत की, ते पक्क्या घरात रहात असले तरी ॲम्युनिशन फॅक्टरीच्या रेडझोनमुळे अनधिकृत ठरले आहेत, या वास्तवतेकडे सभागृहाचे लक्ष वेधले. ते म्हणाले की, एकीकडे आपण कायद्यात सुधारणा करण्याच्या गोष्टी करतो. पण रेडझोनसाठी आपण १९०३ चा ब्रिटीशकालीन इंडियन डिफेन्स ॲक्टनुसार २ हजार यार्ड मर्यादा आखतो. पण १९७० सालच्या युनायटेड नेशनच्या स्टोरेज टेक्निकल एक्स्प्लोसिव्ह कमिटीच्या आपण स्वीकारलेल्या कायद्यानुसार २०० ते ५०० मीटर इतकीच रेडझोनची मर्यादा असली पाहिजे याचा विचार करत नाही, असे सांगून खासदार डॉ. कोल्हे यांनी १९७० साली आपण स्वीकारलेल्या कायद्यानुसार ५०० मीटर रेडझोनची मर्यादा करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी केली.

# पिंपरीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे घंटानाद आंदोलन

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात घंटानाद आंदोलन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने घंटानाद आंदोलन केले. हे सरकार रोहित पवार यांच्या पाठीमागे जाणूनबुजून ईडी लावत असल्याचा आरोप करत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात घंटानाद आंदोलन करण्यात आले. यावेळी पोलीस आणि आंदोलक समोरासमोर आले




होते. आंदोलक देखील अधिक आक्रमक झाले होते. सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका क्षुलक्षणा धर यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. पिंपरी- चिंचवड हा अजित पवार यांचा बालेकिल्ला आहे. शहरात राष्ट्रवादीत दोन गट पडले असून रोहित पवार यांच्या समर्थनार्थ आणि महानगर पालिकेतील भ्रष्टाचाराच्या विरोधात शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात जोरदार घोषणाबाजी करत शिंदे, फडणवीस आणि पवार सरकारचा निषेध करण्यात आला. महानगर पालिकेत १,२०० कोटींचा टीडीआर घोटाळा झाला. श्रीमंत महानगर पालिकेला आज ५०० कोटींचे कर्ज काढण्याची वेळ येते आहे. ६५ हजार कोटींच्या ठेवी मोडण्याची वेळ का आली ? असे अनेक प्रश्न उपस्थित करत राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून घंटानाद आंदोलन करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने घंटानाद आंदोलन केले. हे सरकार रोहित पवार यांच्या पाठीमागे जाणूनबुजून ईडी लावत असल्याचा आरोप करत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात घंटानाद आंदोलन करण्यात आले.

# मोरे वस्ती, चिखली येथे गॅस सिलेंडरची अवैध वाहतूक व साठवणुकीवर मोठी कारवाई

## अन्नधान्य वितरण कार्यालयाकडून ३५ लाख ७२ हजारांचा मुद्देमाल जप्त



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** अन्नधान्य वितरण कार्यालयाच्यावतीने मोरे वस्ती, चिखली, पिंपरी चिंचवड येथे बुधवारी छापा टाकून मामा गॅस सर्विस एजन्सीविरुद्ध गॅस सिलेंडरची अवैध साठवणूक, वाहतूक या अनुषंगाने मोठी कारवाई करत ३५ लाख ७३ हजार ५४५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी दादासाहेब गिते यांनी दिली.या कारवाईमध्ये ४ मोठी वाहने, हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस भरलेले १०५ सिलेंडर व रिकामे ६०२ सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईत आरोपी भिकचंद हिरालाल कात्रे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. कात्रे यांच्याविरुद्ध चिखली पोलीस ठाण्यात भादवी कलम ४२०, २८५, २८६ सह जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ नुसार तसेच एलपीजी (पुरवठा व वितरण आदेश) आदेश २००० चे कलम ३ ते ७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई परिमंडळ अधिकारी सचिन काळे, पुरवठा निरीक्षक श्रीमती स्नेहल गायकवाड, अमोल हाडे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय मोरे आदींनी केली आहे, असेही गिते यांनी कळविले आहे.अन्नधान्य वितरण कार्यालयाच्यावतीने मोरे वस्ती, चिखली, पिंपरी चिंचवड येथे बुधवारी छापा टाकून मामा गॅस सर्विस एजन्सीविरुद्ध गॅस सिलेंडरची अवैध साठवणूक, वाहतूक या अनुषंगाने मोठी कारवाई करत ३५ लाख ७३ हजार ५४५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी दादासाहेब गिते यांनी दिली.या कारवाईमध्ये ४ मोठी वाहने, हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस भरलेले १०५ सिलेंडर व रिकामे ६०२ सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमध्ये ४ मोठी वाहने, हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस भरलेले १०५ सिलेंडर व रिकामे ६०२ सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.

### ६०२ सिलेंडर जप्त करण्यात आले

» या कारवाईमध्ये ४ मोठी वाहने, हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस भरलेले १०५ सिलेंडर व रिकामे ६०२ सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईत आरोपी भिकचंद हिरालाल कात्रे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. कात्रे यांच्याविरुद्ध चिखली पोलीस ठाण्यात भादवी कलम ४२०, २८५, २८६ सह जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ नुसार तसेच एलपीजी (पुरवठा व वितरण आदेश) आदेश २००० चे कलम ३ ते ७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई परिमंडळ अधिकारी सचिन काळे, पुरवठा निरीक्षक श्रीमती स्नेहल गायकवाड, अमोल हाडे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय मोरे आदींनी केली आहे, असेही गिते यांनी कळविले आहे.

# रावेत येथे निवासी शाळेत अल्पवयीन मुलीवर बलात्कार

## क्रिएटिव्ह अकॅडमीच्या नौशाद शेखला अटक

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** मी तुला फिजिकली इन्व्हॉल्व्ह होऊन डेव्हलप करेन. तुझे करिअर बनवेल, तू माझ्यासोबत रिलेशनमध्ये राहा असे म्हणत क्रिएटिव्ह अकॅडमीच्या नौशाद शेखने दहावीतील विद्यार्थीनीवर वारंवार बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शेख याने दहा वर्षांपूर्वी देखील असाच गुन्हा केल्याने त्याला अटक करण्यात आली होती. यावेळेस क्रिएटिव्ह अकॅडमीच्या एका माजी विद्यार्थिनीला देखील या घृणास्पद कृत्यात सहभागी असल्याच्या कारणाने अटक करण्यात आली आहे. वर्षभरानंतर हा सगळा प्रकार उघडकीस आला आहे.क्रिएटिव्ह अकॅडमीचा संचालक नौशाद अहमद शेख (वय ५८) आणि माजी विद्यार्थिनी रागिणी पाटील या दोघांना तीन दिवसांपूर्वी अटक करण्यात आली असून, सध्या दोघांची रवानगी पोलीस कोठडीत करण्यात आली आहे. या प्रकरणी पीडित १६ वर्षीय मुलीच्या वडिलांनी फिर्याद दिली असून, रावेत पोलीस ठाण्यात या प्रकरणी बलात्कार, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, विनयभंग आदी कलमांतर्गत ३० जानेवारीला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी याबाबत माहिती दिली. रावेत कॉर्नर येथे नौशाद शेख हा क्रिएटिव्ह अकॅडमी या नावाखाली निवासी शाळा चालवतो. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये जाऊन मुलांना-मुलींना आठवी ते बारावी करिता निवासी शाळेत ॲडमिशन घेण्यासाठी सेमिनारद्वारे प्रोत्साहित करतो. सन २०२१ मध्ये शेख याने यवतमाळमध्ये जाऊन अशाच प्रकारे सेमिनार घेतला होता. त्यानंतर पीडित मुलीच्या वडिलांनी तिला नववी इयत्तेमध्ये निवासी शाळेत २ लाख २६ हजार रुपये भरून प्रवेश घेऊन दिला होता. या शाळेमध्ये सध्या सुमारे ७५ मुली आणि शंभरहून अधिक मुले आठवी ते बारावी इयत्तेचे शिक्षण घेत आहेत. येथे शिकणाऱ्या मुलांना मोबाईल वापरण्यास तसेच कुटुंबाशी संपर्क करण्यास मनाई करण्यात आली आहे. महिन्यातून एकदा पालक मीटिंगसाठी आल्यानंतर आपल्या पाल्याला भेटू शकतात, असा येथील नियम आहे. त्यामुळे येथे घडणाऱ्या प्रकाराची माहिती पाल्य आपल्या पालकांना वेळीच देऊ शकत नाहीत. शेख हा या क्रिएटिव्ह अकॅडमीच्या मुलींच्या हॉस्टेलमध्येच पहिल्या मजल्यावर राहतो. त्याने पीडित मुलगी १४ वर्षांची असताना वारंवार अत्याचार केले आहेत. मुलीवर सुरुवातीला २०२२ मध्ये त्याने तो राहात असलेल्या फ्लॅटमध्ये बोलावून घेत विनयभंग करून अत्याचाराचा प्रयत्न केला होता. तेव्हा पीडित मुलीने त्याला विरोध करून तिथून निघून गेली होती.

# पालिकेकडून कोट्यवधी 'निविदांचा पाऊस

## दोन दिवसांत कालावधीत किमान १५० कोटींच्या १३८ निविदा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** नगरसेवकांच्या दबावामुळे मार्च महिन्यात मोठ्या प्रमाणावर निविदा काढाव्या लागत असल्याचा दावा करणाऱ्या महापालिकेने आर्थिक वर्ष संपुष्टात येत असताना आणि लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या शक्यतेने ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी या दोन दिवसांच्या कालावधीत किमान १५० कोटींच्या १३८ निविदा काढल्या आहेत. विविध विभागांनी या निविदा काढल्या असून, १० लाखांपासून कोट्यवधी रुपयांपर्यंतची कामे यामध्ये प्रस्तावित करण्यात आली आहेत.अंदाजपत्रकातील कामे पूर्ण करण्यासाठी वर्षभराचा कालावधी



असतानाही आर्थिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याने त्याबाबत शंका उपस्थित होण्यास सुरुवात झाली आहे.महापालिका प्रशासनाकडून अंदाजपत्रकात कोट्यवधी रुपयांची कामे प्रस्तावित केली जातात. या कामांसाठी विभागनिहाय आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली जाते. नव्या आर्थिक वर्षाच्या एक एप्रिलपासून अंदाजपत्रकाची अंमलबजावणी सुरू होते. कामांसाठी तरतूद असल्याने ही कामे मुदतीमध्ये पूर्ण करणे अपेक्षित असते. मात्र महापालिका प्रशासनाने यंदा शेवटच्या टप्प्यात निविदा काढण्याचा विक्रम केला आहे. लोकसभा निवडणूक एप्रिल-मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्याची आचारसंहिता मार्च महिन्याच्या मध्यापासून लागेल, असा प्रशासकीय अंदाज आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी २५ फेब्रुवारीपर्यंत निविदाप्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश खातेप्रमुखांना दिला आहे. त्यानुसार उद्यान, पाणीपुरवठा, मलनि:सारण, पथ, विद्युत विभागाबरोबरच सर्व क्षेत्रीय कार्यालयांकडून लहान-मोठ्या कामांच्या निविदा काढण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार गेल्या दोन दिवसांत सुमारे दीडशे कोटींच्या १३८ निविदा काढण्यात आल्या आहेत.

अंदाजपत्रकातील निधी वाया जाऊ नये, यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.महापालिकेचा कारभार प्रशासकाच्या हाती जाण्यापूर्वीही अंदाजपत्रकाच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात नगरसेवकांकडून विविध कामांचे प्रस्ताव स्थायी समितीमार्फत मुख्य सभेत मंजूर करून घेतले जात होते. त्यासाठी निविदाप्रक्रिया राबविण्याची चढाओढ सर्वपक्षीय नगरसेवकांमध्ये दिसून येत होती. तर अंदाजपत्रकातील विविध कामांचा शिल्लक राहिलेला निधी अन्य कामांसाठी खात्याकडून वर्ग करून घेतला जात होता. त्यामुळे अंदाजपत्रकाची अंमलबजावणी किती झाली, याबाबतही कायम शंका उपस्थित होत होती. सध्या योजना, प्रकल्पांसाठी राखीव असलेला निधी अन्य कामांसाठी वळविण्याचे प्रस्ताव विभागांकडून स्थायी समितीला देण्यास सुरुवात झाली आहे. या निविदा काढल्या असून, १० लाखांपासून कोट्यवधी रुपयांपर्यंतची कामे यामध्ये प्रस्तावित करण्यात आली आहेत.अंदाजपत्रकातील कामे पूर्ण करण्यासाठी वर्षभराचा कालावधी असतानाही आर्थिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याने त्याबाबत शंका उपस्थित होण्यास सुरुवात झाली आहे.

# पुणे लोकसभेसाठी मनसेच्या उमेदवारांचा अहवाल तयार

## पुणे लोकसभा निवडणुकीसाठी पाच पदाधिकाऱ्यांची नावे निश्चित

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून पुणे लोकसभा निवडणुकीसाठी पाच पदाधिकाऱ्यांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. निश्चित केलेल्या पाच नावांचा अहवाल अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. या पाचमधून राज ठाकरे एका नावाची घोषणा करणार आहेत. मात्र सध्याच्या नावांबरोबर भविष्यात आणखी



काही नावांची चर्चा होऊ शकते, असा दावा मनसे पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.त्यादृष्टीने पुण्यात मनसेची संघटनात्मक बांधणी सुरू झाली आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने पुणे दौऱ्यावर येत असून विधानसभा मतदारसंघ निहाय आढावा बैठकाही पक्षाच्या स्तरावर सुरू झाल्या आहेत. मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांना पुणे लोकसभेच्या समन्वयाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. लोकसभेची निवडणूक एप्रिल- मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मनसेकडून उमेदवारांची चाचपणीही सुरू करण्यात आली होती. त्यानुसार पक्षाने माजी गटनेते वसंत मोरे, शहराध्यक्ष साईनाथ बाबर, बाबू वागसकर, किशोर शिंदे आणि गणेश सातपुते या पाच जणांची नावे राज ठाकरे यांना कळविली आहेत. या नावामधून एका नावाची घोषणा राज ठाकरे यांच्याकडून करण्यात येणार आहे. दरम्यान, उमेदवारीचा अंतिम निर्णय घेण्यासाठी अजून वेळ आहे. त्यामुळे चर्चेत असलेल्या नावांमध्ये काही नावांचा समावेश होऊ शकतो, असे मनसे पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.राज यांचे चिरंजीव अमित यांना पुणे लोकसभेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यादृष्टीने अमित सातत्याने बैठका घेत असून संघटनात्मक बांधणीला त्यांनी प्राधान्य दिले आहे. लोकसभेची जबाबदारी असल्याने पुण्यातील उमेदवार निश्चित करण्यात त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरण्याची शक्यता आहे.

# राज्यात सुमारे ९० टक्के कुटुंबांचे सर्वेक्षण

## आचारसंहितेपूर्वी अहवाल सरकारकडे?

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्याची मुदत शुक्रवारी संपली असून, राज्यात सुमारे ९० टक्के कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. ज्या जिल्ह्यातील सर्वेक्षणाचे काम प्रलंबित असेल, तेथे अपवादात्मक परिस्थितीत सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्याचे संकेत राज्य मागासवर्ग आयोगाने दिले आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी सर्वेक्षणाचा सर्वंकष अहवाल राज्य सरकारकडे दिला जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता मार्चच्या पहिल्या आठवडयात




लागू होण्याची शक्यता गृहित धरून सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्यास आयोगाने नकार दिला. त्यानुसार शुक्रवारी रात्री १२ वाजेपर्यंत सर्वे क्षणाचे काम करण्यात आले.राज्यातील ३६ जिल्हे, २७ महानगरपालिका आणि सात कटक मंडळांमध्ये (कॅन्टोन्मेंट बोर्ड) हे सर्वे क्षण करण्यात आले. घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याची जबाबदारी प्रगणक, पर्यवेक्षकांवर सोपवण्यात आली होती. त्यासाठी राज्यभरातील एकूण एक लाख २५ हजारपेक्षा अधिक प्रगणक, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. मराठा समाजाचे मागासलेपण जाणून घेण्यासाठी करण्यात आलेल्या या सर्वेक्षणामध्ये विविध प्रकारची माहिती संकलीत करण्यात आली. त्यासाठी पुण्यातील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेने प्रश्नावली तयार केली होती.राज्य मागासवर्ग आयोगाकडे राज्यातील सर्वेक्षणाचा विदा जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांमार्फत शनिवारी (३ फेब्रुवारी) सकाळी १० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. संकलित माहितीची वर्गवारी करणे, गुणोत्तर काढणे याबरोबरच चुका, शंकाही दूर करण्यात येतील. त्यानंतर जाहीर प्रकटनावर प्राप्त हरकती, सूचनांवर सुनावणी घेतली जाईल. त्यानुसार सर्वंकष अहवाल तयार करून तो राज्य सरकारला सादर केला जाईल. त्यानंतर राज्य सरकार विशेष अधिवेशन बोलावून मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत निर्णय घेण्याची शक्यता आहे. सर्वेक्षणातील माहितीच्या आधारे मराठा आरक्षणासाठी राज्य सरकार नवा कायदा आणण्याची किंवा आणखी काही पर्याय देण्याची शक्यता आहे.अलिबाग : मराठा समाजाला आरक्षण द्यायचे असेल तर ते ओबीसी प्रवर्गाच्या आरक्षणातच द्यावे लागेल, त्याला पर्याय नाही, असे स्पष्ट मत राज्यघटनेचे अभ्यासक उल्हास बापट यांनी अलिबाग येथे व्यक्त केले. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता, न्यायालयात टिकेल असे आरक्षण मराठा समाजाला दिले जाईल, असे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री सांगत आहेत, पण कसे देणार हे मात्र ते सांगत नाहीत. कारण सध्याच्या परिस्थितीत या दोन्ही गोष्टी शक्य नाहीत, अशी पुस्तीही त्यांनी जोडली. राज्य सरकारने निश्चित केलेल्या वेळेत अहवाल सादर करायचा आहे. लोकसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्वे क्षणाला २ फेब्रुवारीनंतर मुदतवाढ देण्यात आली नाही. सर्वेक्षणाचा अहवाल जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांच्याकडून आयोगाकडे येईल.

# रामायणातील पात्र आक्षेपार्ह दाखवल्याचा 'अभविप' चा आरोप

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ; नाटक पाडले बंद

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मागील काही महिन्यापासून पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कोणत्या ना कोणत्या कारणास्तव चर्चेत राहत आले आहे. तर आज सायंकाळच्या सुमारास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये ललित कला केंद्रातील विद्यार्थ्यांमार्फत रामायणामधील घटनेवर आधारित 'जब वी मेट' या नाटकाचा प्रयोग आयोजित



करण्यात आला होता.मात्र या नाटकातील संवादावर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आक्षेप घेत,या नाटकाचा प्रयोग उधळून लावला.या नाटकाच्या विरोधात अभविपकडून जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. या घटनेमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच, पोलीस काही मिनिटात घटनास्थळी दाखल झाल्यावर परिस्थिती नियंत्रण आणण्यात आली. या घटनेबाबत अभाविप प्रदेश सहमंत्री शुभंकर बाचल म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्र तर्फे रामलीला नाटक आयोजित केले होते. या नाटकामध्ये माता सीता आणि प्रभू श्रीराम यांचा अपमान केल्याचे दिसले. याचा विरोध केल्यावर अभाविप च्या कार्यकर्त्यांवर काठ्यांनी मारहाण करण्यात आली. या घटनेचा अभाविप तीव्र शब्दात निषेध व्यक्त करते आणि यामध्ये सहभागी असणार्‍या सर्व प्राध्यापकावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली.मागील काही महिन्यापासून पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कोणत्या ना कोणत्या कारणास्तव चर्चेत राहत आले आहे.